<u>राज्यातील सैनिकी शाळांमधील आदिवासी विदयार्थ्यासाठी इ. ११ वी (विज्ञान) व नैसर्गिक वाढीने १२ वी (विज्ञान) अतिरीक्त तुकडी मंजूर करणेबाबत..</u>

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : इसैशा-२०१४/(१११/१४)/एसएम-६

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
तारीख: ०८ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा</u> -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक इसैशा १०९५/(२७८/९५)/माशि-८, दिनांक २६ सप्टेंबर, १९९५

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक इसैशा १००१/(१८५/२००१)/माशि-७, दिनांक ५ जुलै, २००२

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक इसैशा २००६/प्र.क्र.१२३/माशि-७, दिनांक २४ डिसेंबर, २००७

<u>प्रस्तावना-</u>

राज्यात खाजगी व सक्षम स्वयंसेवी संस्थांना माध्यमिक स्तरावर सैनिकी शिक्षण देणा-या शाळा सुरु करण्यास संदर्भाधीन क्र.(१) येथील दिनांक २६ सप्टेंबर, १९९५ च्या शासन निर्णयान्वये परवानगी दिली आहे. सन १९९६-९७ पासून शासनाने परवानगी दिलेल्या ज्या सैनिकी शाळेमध्ये इयत्ता १० वी पर्यंतचे वर्ग आहेत तेथे इयत्ता ११ वी व नैसर्गिक वाढीने इयत्ता १२ वी चा शास्त्र (विज्ञान) शाखा अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भाधीन क्र.(२) येथील दिनांक ५ जुलै, २००२ च्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे. या सैनिकी शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी सैनिकी शाळांतील सर्वसाधारण तुकडीस जोडून जादा तुकडी सन २००८-०९ पासून सुरु करण्यास संदर्भाधीन क्र.(३) येथील दि.२४ डिसेंबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये परवानगी दिलेली आहे.

२. सन २००८-०९ पासून सैनिकी शाळेला जोडून परवानगी दिलेल्या आदिवासी तुकडीतील विदयार्थी नैसर्गिक वाढीने सन २०१४-१५ पासून इयत्ता ११ वी व सन २०१५-१६ मध्ये इयत्ता १२ वी च्या तुकडीत आले आहेत. अशा शाळांमध्ये आदिवासी विदयार्थ्यांसाठी सन २०१४-१५ पासून इयत्ता ११ वी

शास्त्र (विज्ञान) ची एक तुकडी व सन २०१५-१६ पासून नैसर्गिक वाढीने इयत्ता १२ वी शास्त्र (विज्ञान) ची एक तुकडी सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

संदर्भाधिन क्र.(३) येथील दिनांक २४.१२.२००७ च्या शासन निर्णयान्वये सन २००८-०९ पासून सैनिकी शाळेला जोडून परवानगी दिलेल्या आदिवासी तुकडीतील विदयार्थी नैसर्गिक वाढीने सन २०१४-१५ पासून इयत्ता ११ वी च्या तुकडीत व सन २०१५-१६ मध्ये इयत्ता १२ वी च्या तुकडीत आले आहेत. अशा सैनिकी शाळांमध्ये आदिवासी विदयार्थ्यांसाठी सन २०१४-१५ पासून इयत्ता ११ वी (विज्ञान) ची एक तुकडी व सन २०१५-१६ पासून नैसर्गिक वाढीने इयत्ता १२ वी (विज्ञान) ची एक तुकडी सुरु करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सैनिकी शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन खालील सैनिकी शाळांना सन २०१४-१५ पासून इयत्ता ११ वी च्या प्रत्येकी एक प्रमाणे ६ आदिवासी तुकडया व सन २०१५-१६ पासून इयत्ता १२ वीच्या प्रत्येकी १ प्रमाणे एकूण २ आदिवासी तुकडया अशा एकूण ८ आदिवासी तुकडयांना मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	शाळेचे नाव	मान्य करण्यात आलेली तुकडी संख्या	
		११ वी ची तुकडी	१२ वी ची तुकडी
१.	छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय, मोराणे, जि धुळे.	२	१
२.	राष्ट्रमाता इंदिरा गांधी सह शिक्षण सैनिकी शाळा, रेल्वे गेटजवळ, बीड बायपास रोड, औरंगाबाद.	१	--
३.	नवगन सैनिकी विद्यालय, राजुरी (न), बीड, जि.बीड .	१	--
४.	राजीव गांधी मिलीट्री स्कूल, अजिंठा रोड, कोलवड, बुलढाणा.	१	१
५.	राजमाता जिजाऊ मुलींची सैनिकी शाळा, बुलढाणा.	१	--

३. सदर सैनिकी शाळांना परिच्छेद २ प्रमाणे आदिवासी तुकडी (शाखा विज्ञान) सुरू करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१) आदिवासी विद्यार्थ्यांची पटसंख्या ४५ च्या मर्यादेत असावी.
२) विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ज्या ठिकाणी आदिवासी तुकडयांसाठी विदयार्थी संख्या ४५ पेक्षा कमी आहे अशा सैनिकी शाळेमधील आदिवासी विदयार्थ्यांचे समायोजन सर्वसाधारण तुकडयांमध्ये करण्यात यावे व समायोजित केलेल्या आदिवासी विदयार्थ्यांचा खर्च आदिवासी विकास विभागाकडून करण्यात यावा.
३) सैनिकी शाळामध्ये प्रवेश दिलेल्या सर्व आदिवासी विदयार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परिक्षेस (इयत्ता १२ वी विज्ञान) बसता येईल आणि कोणत्याही विदयार्थ्याचे नुकसान होणार नाही याची तसेच राष्ट्रीय प्रबोधिनीच्या परिक्षेला पात्र होतील याची दक्षता संस्थेने/शाळेने घेणे आवश्यक राहील.
४) या सैनिकी शाळांमध्ये आदिवासी तुकडी सुरू झाल्यानंतर पुढील शैक्षणिक वर्षासाठी नैसर्गिक वाढीमुळे अनुज्ञेय होणा-या आदिवासी तुकडीवरील खर्च याबाबतची आर्थिक जबाबदारी पूर्णत: आदिवासी विकास विभागाची राहिल.
५) या सैनिकी शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थेची राहील. त्यासाठी कोणतेही वेगळे अनुदान शासनामार्फत देण्यात येणार नाही.

४. संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्तीची तसेच पटसंख्येच्या निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून तसेच भौतिक सोयी सुविधांची उपलब्धता विचारात घेऊन सदर सैनिकी शाळेतील आदिवासी तुकडीस मान्यता देण्यात आली आहे. ही बाब संबंधित संस्थेला शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी कळवावी.

५. सदर तुकडीवरील शिक्षक पद मान्यतेबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय आदिवासी विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४/का.११, दिनांक ९.९.२०१५ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५३१/व्यय-५/वित्त विभाग, दिनांक २२.५.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९०८१५५५२१२२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sangita Dinesh Shelke

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, cn=Sangita Dinesh Shelke
Date: 2017.09.08 15:45:13 +05'30'

(संगिता शेळके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिवालय,
२) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्यकारी अधिकारी,
३) विरोधी पक्ष नेता, विधान सभा, मुंबई
४) विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, मुंबई
५) सर्व विधान सभा व विधान परिषद सदस्य
६) प्रधान सचिव, (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
७) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
८) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
९) विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
१०) विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
११) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, धुळे
१२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद
१३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा
१४) निवड नस्ती (एसएम-६).